04-02-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 02/03/2025 11:14 PM Page 1

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



काणकोण येथील रवींद्र भवनात गैरसोय पान ३ वर



बुमराह चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर पडण्याची शक्यता पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 153 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 4 February 2025 | Pages 4 | ₹ 4

# गोव्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी ४८२ कोटी !

## केंद्रीय अर्थसंकल्पात दक्षिण पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे अंतर्गत महत्त्वाच्या प्रकल्पांना मिळणार गती

टीम दैनिक हेराल्ड :

**मडगाव, दि. ३ : २०२५–२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात दक्षिण पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे अंतर्गत गोव्यातील रेल्वे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ४८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी घोषणा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. दक्षिण पश्चिम रेल्वे उपक्रमांद्वारे गोव्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी एकूण ५,६९६ कोटी रुपये गुंतवणूक केली जाणार आहे, ज्यामध्ये स्टेशन विकास, नवीन रेल्वे मार्गांचे बांधकाम, ट्रॅक दुहेरीकरण, नूतनीकरण आणि विद्युतीकरण यांचा समावेश आहे.**

राज्यात ट्रॅक दुहेरीकरणाला सतत विरोध होत असताना, दक्षिण पश्चिम रेल्वे हा प्रकल्प अंतिम मुदती पूर्ण करण्यासाठी काम करत असताना ही तरतूद करण्यात आली आहे.

दक्षिण पश्चिम रेल्वे आणि कोकण रेल्वे अंतर्गत रेल्वे प्रकल्पांना समाविष्ट करून गोव्यासाठी एकूण ४८२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी पुष्टी कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड चे जनसंपर्क उपमहाव्यवस्थापक बबन घाटगे यांनी मंत्र्यांच्या घोषणेनंतर माध्यमांशी बोलताना केली.गुंतवणुकीच्या तपशिलांचा विस्तार करताना घाटगे पुढे म्हणाले, दक्षिण पश्चिम रेल्वेसाठी एकूण गुंतवणूक ५,६९६ कोटी रुपये आहे. यामध्ये स्थानकांचे अपग्रेड, नवीन रेल्वे मार्ग, ट्रॅक दुहेरीकरण, नूतनीकरण आणि विद्युतीकरण यांचा समावेश आहे.

कोकण रेल्वेसाठी अर्थसंकल्पात विशिष्ट तरतूद नसल्याबद्दल विचारले असता, घाटगे यांनी स्पष्ट केले की , कोकण रेल्वेच्या दुहेरीकरण आणि विद्युतीकरण प्रकल्पांसाठी निधी आमच्या स्वतःच्या महसुलातून मिळवला जातो.आणखी एका वरिष्ठ केआरसीएल अधिकाऱ्याने नमूद केले की कोकण रेल्वे प्रामुख्याने स्वतःच्या प्रकल्पांना निधी देते, परंतु आवश्यकतेनुसार मंत्रालयाकडून आर्थिक मदत मिळते. गोव्यातील आगामी रेल्वे विकासात मये आणि नेवरा येथे नवीन रेल्वे स्थानके निर्माण केली जातील. याव्यतिरिक्त, केआरसीएलने प्रवासी सुविधा सुधारण्यासाठी मडगाव रेल्वे स्थानक आणि इतर प्रमुख ठिकाणी महत्त्वपूर्ण नूतनीकरण प्रकल्प हाती घेतले आहेत.

राष्ट्रीय अर्थसंकल्पाच्या घोषणेदरम्यान, रेल्वे वाटपांवरील महत्त्वाचे अपडेट्स शेअर करण्यात आले, ज्यामध्ये कार्यक्षमता आणि पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी भारतीय रेल्वेसाठी २,५२,२०० कोटी रुपयांचा विक्रमी अर्थसंकल्पीय खर्च अधोरेखित करण्यात आला. या क्षेत्रासाठी एकूण भांडवली खर्च २,६५,२०० कोटी रुपये निश्चित करण्यात आला आहे, जो २००९–१४ च्या आर्थिक वर्षात वाटप केलेल्या ४५,९०० कोटी रुपयांपेक्षा कितीतरी जास्त आहे.

सरकारने २०२५–२६ मध्ये नवीन रेल्वे मार्गांसाठी ३२,२३५.२४ कोटी रुपये वाटप केले आहेत, जे २००९–१४ च्या आर्थिक वर्षातील सरासरी वार्षिक अर्थसंकल्पीय ५,०७५ कोटी रुपयांपेक्षा लक्षणीय वाढ आहे. त्याचप्रमाणे, गेज रूपांतरणासाठी ४,५५० कोटी रुपये वाटप करण्यात आले आहेत, जे मागील कालावधीतील वार्षिक ३,०८८ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

आर्थिक वर्ष २००९–१४ मध्ये १६,०२९ कोटी रुपयांच्या तुलनेत २०२५–२६ साठी रोलिंग स्टॉकचे बजेट ५७,६९३ कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. रेल्वे नेटवर्कमधील ट्रॅक दुहेरीकरण प्रकल्पांना ३२,००० कोटी रुपये मिळतील, जे आर्थिक वर्ष २००९–१४ मध्ये दरवर्षी २,४६१ कोटी रुपये होते.

सुरक्षितता वाढवणे हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे, ज्यामध्ये सुरक्षेशी संबंधित उपक्रमांसाठी १,१६,५१४ कोटी रुपये वाटप केले आहेत. याव्यतिरिक्त, देशभरात रोड ओव्हर ब्रिज आणि रोड अंडर ब्रिज बांधण्यासाठी ७,००० कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहेत, जे आर्थिक वर्ष २००९–१४ मध्ये ९१६ कोटी रुपयांपेक्षा जास्त आहेत . ट्रॅक नूतनीकरणाच्या प्रयत्नांसाठी आणखी २२,८०० कोटी रुपये बाजूला ठेवण्यात आले आहेत.

प्रवाशांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी, भारतीय रेल्वे १७,५०० नॉन–एसी जनरल कोच तयार करेल. पुढील पाच वर्षांत, पारंपरिक आयसीएफ कोच टप्प्याटप्प्याने बंद करून सुरक्षित एलएचबी कोच वापरण्यात येतील. बहुप्रतिक्षित वंदे स्लिपर ट्रेन सध्या चाचणी घेत आहे, २०२५ ते २०२७ दरम्यान ५० युनिट्स उत्पादनासाठी तयार आहेत. एकूण २०० रॅक तयार केले जातील. दरम्यान, ऑनबोर्ड सेवा सुधारण्याच्या प्रयत्नांमध्ये अन्नाची गुणवत्ता वाढविण्यासाठी ६०० बेस किचन सुरू करणे आणि परवडणारे प्रवास पर्याय प्रदान करण्यासाठी प्रगत वैशिष्ट्यांसह सुसज्ज १०० नॉन–एसी अमृत भारत ट्रेन सुरू करणे समाविष्ट आहे.

# मिशा कापल्यामुळे ११ लाख दंड

**करौली, दि. ३ :** राजस्थानमधील करौली जिल्हा सध्या एका महापंचायतीच्या निर्णयामुळे चर्चेत आहे. येथील रोन्सी गावातील एका कुटुंबाला २७ जानेवारी रोजी महापंचायतीने ११ लाख रुपयांचा दंड ठोठावण्याचे आदेश दिले होते. रोन्सी गावापासून ४० किमी अंतरावर असलेल्या करीरी गावातील एका कुटुंबाचा अपमान आणि त्यातील एका सदस्याच्या मिशा आणि केस जबरदस्तीने कापल्याचा आरोप या कुटुंबावर लावण्यात आला . पंधरा दिवसांत दंडाची रक्कम जमा न केल्यास संपूर्ण गाव समाजातून बहिष्कृत करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. पंचायतीच्या आदेशाच्या दबावाखाली रोंसी गावातील या कुटुंबाने ३० जानेवारी रोजी ११ लाख रुपये महापंचायतीकडे जमा केले. या घटनेचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. याप्रकरणी अद्याप पोलिसांत तक्रार दाखल झालेली नाही.

करीरी गावातील रहिवासी असलेल्या बाबूलाल यांनी त्यांचा मुलगा कमलेशचा विवाह रॉन्सी गावातील एका मुलीसोबत त्यांचे नातेवाईक पटेल यांच्यामार्फत लावण्याचे निश्चित केले,.पटेल यांच्या व्यतिरिक्त, दोन्ही बाजूंनी कोणीही एकमेकांचे कुटुंब किंवा मुले–मुली पाहिले नव्हते. मुलीच्या कुटुंबियांचा दावा आहे की जेव्हा गोष्टी निश्चित झाल्या तेव्हा दोन्ही कुटुंब फक्त फोनद्वारेच संपर्कात होते.

१७ जानेवारी रोजी बाबूलाल त्याचे कुटुंब आणि नातेवाईकांसह रोन्सी गावात मुलीच्या स्नान समारंभासाठी गेले. जिथे, समारंभाच्या अगदी आधी मुलाच्या घरच्यांनी मुलीला नापसंत केले.गावकऱ्यांनी या प्रकरणाला संपूर्ण रोंसी गावाच्या बदनामाशी जोडले.दुसऱ्याच दिवशी, गावातील स्थानिक पंच–पटेलांनी मुलाची बाजू स्टॅम्प पेपरवर लिहून मुलीला नापसंत केल्याबद्दल ११ लाख रुपये भरपाई दिली. तर दुसरीकडे मुलीच्या कुटुंबीयांनी नियोजित नवरा कमलेशचा भाऊ नरेश याच्या मिशा आणि डोक्याचे केस कापले आणि त्याचा व्हिडिओ बनवून तो सोशल मीडियावर शेअर केला. करीरी गावाने देखील नरेशच्या मिशा आणि डोक्याचे केस कापल्याच्या घटनेला गावाच्या बदनामीची जोड दिली.दोन्ही पक्षांनी पोलिसांकडे तक्रार केली नाही आणि वाद वाढत गेल्याने प्रकरण शांत करण्यासाठी सोसायटीची महापंचायत बोलावण्याचा निर्णय घेण्यात आला.

## निवडक

### उत्तर सीरियामध्ये बॉम्बस्फोट, १५ ठार

अलेप्पो, दि. ३ : सोमवारी उत्तर सीरियातील अलेप्पो प्रांतात एका कार बॉम्बस्फोटात १५ जणांचा मृत्यू झाला आणि डझनभर लोक जखमी झाले. अलेप्पोमधील मानबिज शहराच्या बाहेरील भागात शेतमजुरांना घेऊन जाणाऱ्या कारमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात १४ महिला आणि एका पुरूषाचा मृत्यू झाला. याशिवाय १५ महिला जखमी झाल्या आहेत. दरम्यान, ब्रिटनस्थित सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राइट्सने सांगितले की, या स्फोटात १८ महिला आणि एका पुरूषाचा मृत्यू झाला आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये बशर अल–असद यांना पदच्युत केल्यानंतर अलेप्पोमधील मानबिजमध्ये हिंसाचार सुरूच आहे. सीरियामध्ये अलिकडेच अंतरिम सरकार स्थापन झाले आहे. तथापि, हे सरकार सतत इस्लामिक स्टेट आणि इतर दहशतवादी संघटनांच्या आव्हानांना तोंड देत आहे.

--------

### कुलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यात माजी सैनिक ठार

काश्मीर, दि. ३ : जम्मू–काश्मीरमधील कुलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला असून या हल्ल्यात एक माजी सैनिक शहीद झाला आहे. जम्मू–काश्मीरमधील कुलगाम येथे सोमवारी दहशतवादी हल्ला झाला. या हल्ल्यात एक माजी सैनिक शहीद झाला आहे, तर त्यांची पत्नी आणि मुलगी देखील गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्याच्या घटनेनंतर तिघांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, तोपर्यंत माजी सैनिकाचा मृत्यू झाला होता. दहशतवाद्यांनी माजी सैनिक आणि त्यांची पत्नी आणि मुलीवर अचानक गोळीबार केला, अशी माहिती सांगितली जात आहे.

---------------

### महाकुंभमेळा चेंगराचेंगरी; याचिका फेटाळली

प्रयागराज, दि. ३ : प्रयागराज येथे महाकुंभमेळ्यादरम्यान २९ जानेवारी रोजी घडलेली चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. पण या घटनेबद्दल उत्तर प्रदेशातील अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईची मागणी करणारी याचिका सोमवारी न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्ते वकील विशाल तिवारी यांना अलाहाबाद उच्च न्यायालयात दाद मागण्यास सांगितले. चेंगराचेंगरीची ही दुर्दैवी घटना असून हा एक चिंतेचा विषय आहे. पण याबद्दल उच्च न्यायालयात जावे. एक न्यायालयीन आयोग आधीच स्थापन करण्यात आला आहे, असे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी याचिकाकर्त्याला सांगितले.

---------------

### राम मंदिराचे मुख्य पुजारी यांना ब्रेन हॅमरेज

अयोध्या, दि. ३ : अयोध्येतील श्री रामजन्मभूमी मंदिराचे मुख्य पुजारी आचार्य सत्येंद्र दास यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना लखनऊच्या संजय गांधी पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस मध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्यांना ब्रेन हॅमरेज झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. रविवारी रात्री उशिरा आचार्य सत्येंद्र दास यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना प्रथम अयोध्येतील सिटी न्यूरो केअर रुग्णालयात नेण्यात आले. त्यांची प्रकृती पाहता डॉक्टरांनी त्यांना लखनऊला रेफर करण्याचा निर्णय घेतला. त्यांना पीजीआयच्या न्यूरोलॉजी विभागाच्या आपत्कालीन युनिटमध्ये दाखल करण्यात आले.

### हवामान

कमाल : २८ किमान : २३

आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)

चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७७,१८६ .७४ ↓(३१९.२२ )

निफ्टी : २३,३६१.०५ ↓ (१२१.११)

# सिद्दिकी खानच्या विरोधात दोन आरोपपत्रे दाखल

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : जमीन हडप प्रकरणातील मुख्य संशयित सिद्दिकी ऊर्फ सुलेमान खान याच्याविरोधात दोन वेगवेगळ्या प्रकरणात आरोपपत्रे दाखल करण्यात आली आहेत. विशेष तपास पथकातर्फे वाळपई आणि म्हापसा प्रथमवर्ग न्यायालयात दोन वेगवेगळी आरोपपत्रे दाखल केली आहे. मालमत्तेची बोगस कागदपत्रे तयार करणे, मालमत्तेचे मालक असल्याचे भासवणे आणि बेकायदेशीरपणे जमिनीची मालकी मिळविले, असा आरोप सुलेमानवर करण्यात आला आहे.

थिवी येथील सर्व्हे क्र. ४५५/७, ४६६/५ आणि ४६६/६ मधील जमीन बनावट दस्तावेज तयार करून हडप केल्याचे समोर आले होते. या प्रकरणी तत्कालीन उपनिबंधक अर्जुन शेट्ये यांनी अज्ञात व्यक्तीविरोधात म्हापसा पोलिसांत




तक्रार दाखल केली होती. याची दखल घेऊन म्हापसा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. दरम्यान, जमीन हडप प्रकरणी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली. हे प्रकरण तिथे वर्ग करण्यात आले. अटकेच्या भीतीने सुलेमान पाच वर्षांहून अधिक काळ आपले ठिकाण व वेषभूषा बदलत होता. अखेर चार वर्षांनंतर फरार असलेला मुख्य सूत्रधार सिद्दिकीला हुबळीमधून अटक केली होती. त्यानंतर सिद्दिकीने १३ डिसेंबर २०२४ रोजी पहाटे तुरुंगातून पळ काढला. याच

### जमीन हडप प्रकरण : अडचणीत वाढ

दरम्यान, या प्रकरणी सहभाग असल्यामुळे एसआयटीने संशयित सिद्दिकी याचा साथीदार आसिफ सौदागर याला १४ रोजी अटक केली. गुन्हा शाखेच्या पथकाने एर्नाकुलम–केरळ पोलिसांच्या मदतीने सिद्दिकीला २१ रोजी अटक केली होती. सध्या सिद्दिकी उर्फ सुलेमान खान हा न्यायालयीन कोठडीत आहे. २७ डिसेंबर २०२१ रोजी नोंदविलेल्या दुसऱ्या प्रकरणात त्याने बोगस विक्री करार केला. बोगस सह्या केल्या आणि ते वाळपई उपनिबंधक कार्यालयात सादर केल्या होत्या. दरम्यान, सिद्दिकी विरोधात म्हापसा व वाळपई येथील प्रथम वर्ग न्यायादंडाधिकारी न्यायालयात अनुक्रमे ८५२ आणि ६५६ पानांचे आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

# कालवा फुटू नये म्हणून मंत्र्यांचे देवाला साकडे !

## गोव्याच्या तुलनेत महाराष्ट्रात कालव्याची स्थिती अत्यंत खराब : मंत्री शिरोडकर

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ३ : गोव्यात येणाऱ्या तिलारी धरणाच्या कालव्याची महाराष्ट्रातील स्थिती अत्यंत खराब असून त्याचा फटका गोव्याला बसत आहे, असे जलसंपदा मंत्री सुभाष शिरोडकर यांनी म्हटले आहे. पुढील किमान चार महिने तरी महाराष्ट्रातील कालवा पुन्हा फुटू नये, अशी आपण देवाकडेच प्रार्थना करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. तिलारी कालव्यातून तब्बल दहा दिवसांनंतर सोमवारी गोव्याकडे येणारे पाणी निम्म्या वेगात सुरू झाल्यानंतर मंत्री शिरोडकर यांनी ही प्रार्थना देवाकडे केली आहे.

महाराष्ट्रातील या तिलारी धरण प्रकल्पात गोव्याचा ७० टक्के वाटा असूनही गोव्याकडे येणारा कालवा



महाराष्ट्राच्या हद्दीत वारंवार फुटत आहे. त्यामुळे गोव्याला मिळणाऱ्या पाण्यात वारंवार खंड पडत आहे. कालव्याच्या देखभालीच्या खर्चातही गोवा ७० टक्के वाटा सहन करीत आहे. परंतु महाराष्ट्राच्या तुलनेत या कालव्याची गोव्यातील स्थिती ही खूप चांगली असल्याचा दावा मंत्री शिरोडकर यांनी केला असून कालवा फुटण्याची शक्यता नाही, असा दावा केला आहे. गोव्याच्या हद्दीत कालव्याला भगदाड पडल्यास किंवा कालवा खराब झाल्यास पुढची पाच वर्षे ठेकेदार स्वत:च्या खिशातून हा खर्च उचलेल अशा पद्धतीचा करार करण्यात आलेला असल्याचीही माहिती शिरोडकर यांनी दिली. आठ महिन्यांपूर्वी गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बैठक झाली होती. महाराष्ट्रातील खराब झालेल्या कालव्यांची स्थिती सुधारण्यासाठी या बैठकीत ४००कोटी पान २ ▶

# फक्त १६ टक्के सरकारी वेबसाईट्समध्ये कोकणीचा वापर

## अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे कोंकणी पिछाडीवर : भाषा भवन प्रकल्पही रखडला

विठ्ठलदास हेगडे

पणजी, दि. ३ : देवनागरी लिपीतील कोकणीला ४ फेब्रुवारी १९८७ ला गोव्याची अधिकृत भाषा घोषित केल्यानंतर जवळपास ३८ वर्षे झाली तरी, सरकारी पत्रव्यवहारात या भाषेची उपस्थिती अद्यापही मर्यादित आहे. गोव्यात १९४ सरकारी विभाग आहेत, ज्यात निम–सरकारी महामंडळे आणि स्वायत्त संस्थांचा समावेश आहे, त्यापैकी फक्त ३२ विभागांकडे कोकणी भाषेत अधिकृत वेबसाईट आहेत.

जानेवारी २०२३ पर्यंत, फक्त १२ सरकारी विभागांकडे कोकणी भाषेत वेबसाईट्स होत्या. जरी काही प्रगती झाली असली तरी, कोकणीचा वापर लागू करण्यासाठी किंवा पालन न करणाऱ्या विभागांना दंड करण्यासाठी अधिकृत भाषा कायद्यांतर्गत कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. जबाबदारीच्या अभावामुळे ही अंमलबजावणी मंदावली आहे.

याबाबत राजभाषा विभागाचे




संचालक प्रशांत शिरोडकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी माहिती दिली की, ३२ सरकारी विभागांच्या वेबसाईट्स आता कोकणी भाषेत उपलब्ध आहेत. त्यांनी जोडले की यापैकी २९ आधीच सुरू आहेत, उर्वरित तीन लवकरच ऑनलाईन होण्याची अपेक्षा आहे. आम्ही विविध विभागांना स्मरणपत्रे पाठवत आहोत, परंतु काही भाषांतरासाठी त्यांची माहिती सादर करण्यात घाई करतात, तर काही जास्त वेळ घेत आहेत, असे शिरोडकर म्हणाले.

कोंकणी भाषेचे पालन न करण्याचा मुद्दा विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जानेवारी २०२३ मध्ये उपस्थित केला होता. त्यावेळी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी मान्य केले की केवळ १२ सरकारी वेबसाइट कोकणी भाषेत आहेत आणि अधिक विभागांनी ही भाषा स्वीकारावी यासाठी पावले उचलली जातील असे आश्वासन दिले. या आश्वासनांना न जुमानता, अंमलबजावणी यंत्रणेचा अभाव हा एक महत्त्वाचा अडथळा आहे.

सरकारी फलकांवर आणि इतर कार्यालयातील फलकांवर कोकणीची उपस्थिती सामान्य असली तरी, स्पेलिंगमधील चुका आणि प्रादेशिक उच्चारांमुळे विसंगत वापर यामुळे चिंता निर्माण झाली आहे. प्रतिसादात, अधिकृत भाषा संचालनालय अधिकृत वापरासाठी कोकणी भाषेचे मानकीकरण करण्याच्या दिशेने काम करत आहे. आम्ही मानकीकरणाच्या प्रक्रियेत आहोत आणि आम्ही त्यावर सक्रियपणे काम करत आहोत, असे शिरोडकर म्हणाले.

विभाग नियमितपणे अधिकृत फलक आणि फलकांची तपासणी करतो जेणेकरून ते कोकणी, मराठी आणि इंग्रजीचा योग्य क्रम तसेच योग्य रंग तपशीलांचे पालन करतात याची खात्री केली जाईल. जेव्हा चुका आढळतात तेव्हा विभाग त्या दुरुस्त करण्यासाठी सूचना पाठवतो आणि आवश्यक मार्गदर्शन करतो.

कोंकणी भाषेच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने भाषेसाठी समर्पित केंद्र असलेल्या भाषा भवनाचे बांधकाम प्रस्तावित केले होते. तथापि, उपलब्ध जागेअभावी हा प्रकल्प रखडला आहे. सुरुवातीला पणजीसाठी नियोजित, जिथे गोवा कोकणी अकादमी एकेकाळी होती, जमिनीच्या उपलब्धतेच्या समस्यांमुळे हा प्रकल्प रखडला आहे. विभाग आता पर्यायी जागा शोधण्याच्या प्रक्रियेत आहे.

कोंकणीमध्ये कायदेशीर माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नात, अधिकृत भाषा संचालनालयाने गोव्यातील मुंबई उच्च न्यायालयातील २० महत्त्वाच्या निकालांचे तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचे कोकणीमध्ये यशस्वीरित्या भाषांतर केले आहे. याव्यतिरिक्त, संचालनालयाने १९८५ पासून केलेल्या घटनात्मक सुधारणांचे देखील भाषांतर केले आहे.

# दक्षिणात्य चित्रपट निर्मात्याची शिवोलीत आत्महत्या

टीम दैनिक हेराल्ड



शिवोली, दि. ३ : दक्षिणात्य चित्रपट निर्माते शंकरा कृष्णा प्रसाद चौधरी उर्फ के.पी. चौधरी (४४) याने ओशेल शिवोली येथे राहत्या फ्लॅटमध्ये गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. के.पी चौधरी हे सकाळी फ्लॅटमधून बाहेर आले नसल्याने त्यांच्या शेजारील फ्लॅटमध्ये व्यक्तीने दरवाजा ठोठावला. मात्र फ्लॅटमधून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सदर व्यक्तीने फ्लॅटच्या मालकाला पाचारण केले. मालक घटनास्थळी आल्यावर त्यांनी फ्लॅटचा दरवाजा उघडला तेव्हा मयत बॅडरूममध्ये गळफास लावलेल्या स्थितीत आढळून आला. त्याने नायलॉन दोरी व बॅडशीट फॅनला बांधून ही आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपअधीक्षक संदेश चोडणकर व निरीक्षक सूरज गावस यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. पोलिस उपनिरीक्षक साहील वारंग यांनी पंचनामा केला व व मृतदेह शवविच्छेदनासाठी गोमेकॉत पाठवून दिला आहे. . चौधरी हा शिवोलीमध्ये वास्तव्यास होता. मानसिक तणावातून त्याने ही आत्महत्या केली असावी, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, मृत के. पी. चौधरी याला १३ जून २०२३ मध्ये किस्मतपूर हैदराबाद येथे तेलंगणा पोलिसांच्या सायबराबाद पोलिसांच्या विशेष चौकशी पथकाने ड्रग्स तस्करी प्रकरणी अटक केली होती. त्याच्याजवळ ८२.७५ ग्रॅम कोकेन सापडले होते. या प्रकरणात जामीनावर सुटका झाल्यावर त्याने गोव्यात शिवोली येथे आसरा घेतला होता.

वागातोर येथे त्याने एक पब रेस्टॉरन्ट सुरू केले होते. येथून के.पी. सिलेब्रीटींना ड्रग्स पुरवत असावा असा संशय तेलंगणा पोलिसांनी त्यावेळी व्यक्त केला होता.